## ९) दुध पुरवठा सोसायट्यांना कर्ज पुरवठा :-

**१) कॅश क्रेडीट कर्जे : -**

१) कर्ज मर्यादा - सभासदांना दुध बिल पेमेंटसाठी दुध सोसायटीस क्लिन कॅश क्रेडीट कर्ज मंजूर करीत असताना कर्जाची मर्यादा ती सोसायटीने संघास दुध पुरवठा केलेल्या जास्तीत जास्त १५ दिवसाचे दुध बिलाच्या रक्कमेइतपत राहील. मात्र दुध संघाने दुध बिलाची रक्कम संस्थेच्या बँक कर्जखाती जमा करीत असलेबाबत दिलेले हमीपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच संस्थेच्या संचालक मंडळाने वैयक्तिक व सामुदाईक हमीपत्र कर्ज उचलीपूर्वी दिली पाहिजे.

२) मुदत व व्याजदर - मुदत १ वर्ष व व्याजदर १४ %

**२) नजरगहाण कर्जे :-**

१) कर्ज मर्यादा - पशुखाद्य खरेदी विक्री व्यवहारासाठी नजरगहाण कर्ज मंजूर करणेत येते. संस्थेकडे उपलब्ध स्वभांडवलाच्या दिडपट नजरगहाण कर्ज मर्यादा मंजूर करणेत येईल. मात्र कर्ज उचलीवर ४० % मार्जिन ठेवणेत येईल. माल विक्रीतून आलेली संपूर्ण रक्कम बँक कर्जखाती जमा केली पाहिजे. सदर कर्जास संस्थेच्या संचालक मंडळाने वैयक्तिक व सामुदाईक हमी दिली पाहिजे.

२) मुदत व व्याजदर - मुदत १ वर्ष व व्याजदर १४ %

**३) मध्यम मुदत कर्जे :-**

१) कर्ज मर्यादा - मिल्क प्रॉडक्ट, डिलिव्हरी व्हॅन, गोडावून व ऑफिस इमारत तसेच दुध व्यवसायास उपयुक्त असणाऱ्या मशिनरीसाठी इस्टीमेंट/कोटेशनच्या ७५ % इतपत कर्ज मंजूर करता येईल. मात्र प्रकल्प अहवालानुसार कर्ज फेडीची व आर्थिक परिस्थिती आणि परतफेडीची कुवत लक्षात घेवून मध्यम मुदत कर्जपुरवठा केला जातो.

२) मुदत व व्याजदर - मुदत ५ वर्ष व व्याजदर १४ %